Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844728

# डिजिटल साहित्य आणि बदलते सामाजिक संबंध

प्रा. डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे[1]

**सारांश** (Abstract)

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वेगवान विस्तारामुळे साहित्यनिर्मिती, प्रसार आणि वाचनाच्या पद्धतींमध्ये मूलभूत बदल घडून आले आहेत. "डिजिटल साहित्य" ही नवी साहित्यिक संकल्पना उदयास येऊन तिने सामाजिक संबंधांचे स्वरूप, अभिव्यक्तीचे माध्यम आणि वाचक–लेखक नाते नव्याने घडवले आहे. या शोधनिबंधात डिजिटल साहित्याची संकल्पना, त्याचे प्रकार, बदलते सामाजिक संबंध आणि त्यांचे परस्परसंबंध अभ्यासले आहेत.

## १. **प्रस्तावना**

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब मानले जाते. समाजात होणाऱ्या बदलांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटते, तसेच साहित्य समाजाला दिशा देण्याचे, आशा जागवण्याचे आणि परिवर्तन घडविण्याचे कार्य करते. दु:ख, संघर्ष, अन्याय यांचे चित्रण करतानाच जीवनाकडे सकारात्मक, आशावादी व प्रेरणादायी दृष्टीने पाहण्याची भूमिका साहित्य स्वीकारते. २१ व्या शतकातील डिजिटल क्रांतीमुळे मानवी जीवानासह साहित्याविश्वात अमुलाग्र बदल घडून आले आहेत. डिजिटल क्रांतीमुळे समाजाची रचना, संवादपद्धती आणि नातेसंबंध बदलले असून त्याचा थेट परिणाम साहित्यावर झाला आहे. पारंपरिक छापील साहित्याबरोबरच डिजिटल साहित्याचा उदय झाला असून त्यातून बदलते सामाजिक संबंध प्रभावीपणे व्यक्त होत आहेत.

## २. **डिजिटल साहित्य : संकल्पना व स्वरूप**

डिजिटल माध्यमांवर निर्माण, सादर व प्रसारित होणाऱ्या साहित्याला डिजिटल साहित्य म्हणता येते. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, आणि सोशल मिडिया यांच्या माध्यमातून निर्माण, प्रसारित व वाचले जाणारे साहित्य म्हणजे डिजिटल साहित्य होय. पारंपारिक छापील साहित्याच्या चौकटीबाहेर जाऊन साहित्याने डिजिटल माध्यमात नवे रूप धारण केले आहे. डिजिटल साहित्यात खालील प्रकारांचा समावेश होतो.

डिजिटल साहित्य म्हणजे असे साहित्य - जे डिजिटल माध्यमांवर निर्माण होते. इंटरनेद्वारे प्रसारित केले जाते आणि स्क्रीनवर वाचले, ऐकले किंवा पाहिले जाते. हे साहित्य केवळ मजकुरापुरते मर्यादित नसून ध्वनी, चित्र,व्हिडी, हायपरलिंक, संवादात्मक घटक यांचा समन्वय साधते.

[1] मराठी विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

### ३. डिजिटल साहित्याची वैशिष्ट्ये

- तत्काळ प्रकाशन - लेखक थेट वाचकांपर्यंत पोहचतो.
- व्यापक वाचकवर्ग - भौगोलिक सीमा नाहीत.
- संवादात्मकता (Comment, Share) - वाचक प्रतिक्रिया, टीका, संवाद साधला जातो.
- मल्टिमिडिया स्वरूप - शब्द, आवाज, दृश्ये यामुळे प्रभावी व परिणामकारक
- लेखक–वाचक अंतर कमी
- लोकशाही स्वरूप - नवोदित वाचक व लेखकांसाठीही व्यासपीठ प्राप्त होते.

### ४. डिजिटल साहित्याचे प्रकार

- ब्लॉग, ई-मासिके,
- ई-पुस्तके
- सोशल मीडिया कविता, कथा, गझल
- व्हिडिओ कविता - कथा
- पॉडकास्ट साहित्य
- इंटरॲक्टिव्ह कथा व हायपरटेक्स्ट साहित्य

### ५. डिजिटल साहित्य आणि पारंपारिक साहित्य फरक

| मुद्दा | पारंपारिक साहित्य | डिजिटल साहित्य |
|---|---|---|
| मध्यम | छापील | डिजिटल/ऑनलाईन |
| प्रसार | मर्यादित | जागतिक |
| संवाद | एकतर्फी | द्वितर्फी |
| स्वरूप | मजकूर प्रधान | मल्टिमीडिया |

### ६.डिजिटल साहित्याचे सामाजिक महत्व

- वंचित व दुर्लक्षित घटकांचा आवाज
- सामाजिक प्रश्नावर त्वरित अभिव्यक्ती
- तरुण पिढीचे साहित्याशी नाते अधिक दृढ
- भाषेचा नव्या पद्धतीने विस्तार

**७. सामाजिक संबंधांची बदलती संकल्पना**

डिजिटल समाजात सामाजिक संबंध प्रत्यक्ष भेटींपेक्षा आभासी संवादावर अधिक आधारलेले आहेत. कुटुंब, मैत्री, प्रेम, सहकार्य, संघर्ष, एकाकीपणा अशा भावनांचे स्वरूप बदलले आहे. नात्यांमध्ये वेग, तात्पुरतेपणा आणि आभासीपणा वाढलेला दिसतो.

**८. डिजिटल साहित्यातील बदलते सामाजिक संबंध**

(अ) कुटुंबीय संबंध

डिजिटल साहित्यात संवाद अभावी दुरावत चाललेली नाती, पिढ्यांतील दरी, मोबाईलमुळे हरवलेली आपुलकी यांचे चित्रण आढळते. लघुकथा, कविता यांमधून एकाकी वृद्ध, व्यस्त पालक, डिजिटल मुलं यांची मांडणी दिसते.

(आ) मैत्री व प्रेमसंबंध

सोशल मीडियावर निर्माण होणारी मैत्री, ऑनलाईन प्रेम, आभासी जवळीक आणि अचानक तुटणारी नाती हे विषय डिजिटल साहित्यात प्रकर्षाने येतात. 'चॅट', 'ब्लॉक', 'अनफॉलो' ही नवी सामाजिक प्रतीके साहित्यात स्थान मिळवतात.

(इ) सामाजिक भान व संघर्ष

डिजिटल साहित्य सामाजिक प्रश्नांवर त्वरित प्रतिक्रिया देते. स्त्रीवाद, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी, अन्याय, राजकीय विडंबन यांचे प्रभावी चित्रण डिजिटल माध्यमांतून होते. सामाजिक संवेदनशीलता नव्या रूपात प्रकट होते.

**९. लेखक–वाचक नात्यातील परिवर्तन**

पारंपरिक साहित्यात लेखक व वाचक यांच्यात अंतर होते; डिजिटल साहित्यात हे अंतर कमी झाले आहे. वाचक थेट प्रतिक्रिया देतो, टीका करतो, संवाद साधतो. त्यामुळे साहित्यनिर्मिती अधिक लोकाभिमुख व लोकसहभागी बनते.

**१०. डिजिटल साहित्य : संधी आणि आव्हाने**

**संधी :**

- नवोदित लेखकांना व्यासपीठ
- वंचित समूहांचा आवाज
- साहित्याचे लोकशाहीकरण

**आव्हाने :**

- दर्जाचा प्रश्न
- क्षणिक लोकप्रियता
- साहित्यिक शिस्तीचा ऱ्हास

**११. डिजिटल साहित्य आणि मूल्यसंवर्धन**

डिजिटल साहित्याने केवळ मनोरंजन न करता सामाजिक मूल्ये, माणुसकी, समता, संवेदना यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी संबंध दृढ करण्यासाठी झाला तरच डिजिटल साहित्य सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ठरेल.

**१२. निष्कर्ष**

डिजिटल साहित्य हे बदलत्या सामाजिक संबंधांचे प्रभावी माध्यम बनले आहे. समाजातील ताणतणाव, एकाकीपणा, संघर्ष, तसेच नव्या शक्यता यांचे वास्तववादी चित्रण डिजिटल साहित्य करत आहे. योग्य विवेक, मूल्यभान आणि साहित्यिक जाणीव ठेवून निर्माण झालेले डिजिटल साहित्य समाजाला समृद्ध, जागरूक आणि संवेदनशील बनवू शकते.

**संदर्भग्रंथ**

१. मराठी साहित्य आणि डिजिटल माध्यमे – संशोधन लेख

२. सामाजिक संस्था - डॉ. उत्तम भोईटे व इतर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

३. भारतीय समाज : संरचना, परिवर्तन आणि चळवळी, प्रा. ए. टी. शिंदे, अरुणा प्रकाशन, लातूर

४. ई-साहित्य मंच व नियतकालिके

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*